कार्यालय पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

जि.हिंगोली
दिनांक :- 28.08.2023

# प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक बिभीषण विष्णुपंत पांचाळ, वय 56 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद – कनिष्ठ लिपीक (वर्ग -3) समाज कल्याण विभाग,जिल्हा परीषद हिंगोली, जि.हिंगोली मुळ रा.बिडवे इंजीनिअरींग कॉलेजच्या समोर, समाज कल्याण सोसायटी, पाखरसांगवी लातुर, जि.लातुर यांना 8,000/- रू.ची लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी आंतरजातीय विवाह केला आहे. आंतर जातीय विवाह केलेल्या जोडप्यास महाराष्ट्र शासनाच्या आंतरजातीय विवाह योजने अंतर्गत समाज कल्याण विभागाकडून 50,000/- रू.अर्थ सहाय्य मिळत असल्यामुळे पिडीत तक्रारदार यांनी आंतर जातीय विवाह योजने अंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यासाठी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली येथे विहीत नमुन्यामध्ये अर्ज सादर केलेला आहे. पिडीत तक्रारदार यांनी आज दि.28/08/2023 रोजी ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली येथे येवून आंतर जातीय विवाह योजने अंतर्गत मिळणारी आर्थिक सहाय्य रक्कम 50,000/-रू.तक्रारदार यांचे बँक खात्यात टाकण्यासाठी आरोपी लोकसेवक बिभीषण विष्णुपंत पांचाळ, वय 56 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद – कनिष्ठ लिपीक (वर्ग -3) समाज कल्याण विभाग,जिल्हा परीषद कार्यालय हिंगोली हे 8000/-रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिल्याने आज दि.28/08/2023 रोजी तक्रारदार यांना आलोसे यांनी पंचासमक्ष 8000/- रू.लाचेची मागणी करून लाचेची रक्कम 8000/- रू. स्विकारतांना आज रोजी 16.05 वा.आलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुन्हा दाखल करण्याची पुढील प्रक्रीया चालु आहे.

ही कामगिरी श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.हिंगोली यांनी स.पो.उप.नि/युनुस शेख,विजय शुक्ला, पोहेकॉ/ज्ञानेश्वर पंचलींगे, तानाजी मुंढे, भगवान मंडलीक, गजानन पवार, चापोह/ शेख अकबर,पोना/ गोविंद शिंदे, पोशि/ राजाराम फुपाटे, शिवाजी वाघ लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम (एजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर परीश्रमीका व्यतिरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास कृपया लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वां सुट्टीचे दिवशी लाचलुपचपत प्रतिबंधक कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

(अनिल कटके)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

टोल फ्री क्र.1064, दुरध्वनी क्र.02456-223055,
मोबाईल क्रमांक :- 9623999944,9870221379